# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/०३/२०२५ (रविवार)**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील मा.ना.श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान,भारत सरकारा यांचा दौरा बंदोबस्त यशस्वीपणे पार पाडल्याबाबत

आज दिनांक ३०/०३/२०२५ रोजी मा.ना.श्री. नरेंद्र मोदी, पंतप्रधान, भारत सरकार यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील कोंढाळी पोलीस स्टेशन अंतर्गत शिवा सावंगा येथील एस.डी.ए.एल कंपनी येथे दौरा कार्यक्रम होता. **सदर कार्यक्रम हा संरक्षण व स्फोटक संबधीत कंपनीच्या प्रतिबंधीत क्षेत्रात असल्याने मा. पंतप्रधान यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने बंदोबस्ताचे योग्य व काटेकोर नियोजन आवश्यक होते त्याकरीता मा. पंतप्रधानांच्या सुरक्षेकरीता असलेल्या सर्व नियमावली व निर्देशानुसार नियोजन करून त्यांची पुर्णता अंमलबजावणी करून नागपुर ग्रामीण जिल्हयात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता.** संपुर्ण बंदोबस्ताचे प्रभारी अधिकारी मा. श्री. दिलीप भुजबळ पाटील,विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र हे असुन सह प्रभारी अधिकारी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा हे होते. सदर बंदोबस्तासाठी नागपुर परिक्षेत्रातील जिल्हा वर्धा,भंडारा,चंद्रपुर तसेच जिल्हा गोंदीया, अहेरी जि. गडचिरोली आणि राज्यगुप्तवार्ता विभाग येथुन अधिकारी/अंमलदार हजर झाले होते. जिल्हा विशेष शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात सदर बंदोबस्ताची योग्य आखणी करून कॅन्वॉय ,हेलीपॉड, रोड बंदोबस्त, एस.डी.ए.एल कंपनीतील कार्यक्रम स्थळ बंदोबस्त असा बंदोबस्त आराखडा तयार केला होता. सदर बंदोबस्तात एकुण ५ अपर पोलीस अधिक्षक, १३ उपविभागिय पोलीस अधिकारी, २७ पोलीस निरीक्षक, ५६ सपोनि /पोउपनि, ६१५ पोलीस अंमलदार (पुरूष/महीला) आणि ६ बि.डी.डी.एस पथक, असे अधिकारी/अंमलदार यांनी काटेकोर पणे कर्तव्य पार पाडल्याने मा. ना. श्री. नरेंद्र मोदी,

पंतप्रधान, भारत सरकार यांचा नागपुर ग्रामीण जिल्हयातील दौरा बंदोबस्त यशस्वीरित्या पार पडला. सर्व बंदोबस्तातील अधिकारी/अंमलदार यांचे मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी हार्दीक अभिनंदन केले असुन बंदोबस्तात प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या सहभागी असलेल्या सर्व अधिकारी /अंमलदार यांना बक्षीस जाहीर केले आहे.

## नागपुर ग्रामीण जिल्हयात रमजान ईद निमित्य लावण्यात आला कडेकोट बंदोबस्त

दिनांक ३१/०३/२०२५ रोजी रमजान ईद असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात एकुण ११८ ठिकाणी मुस्लीम बांधवाचे नमाज पठण होणार आहे. त्यासाठी नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे आपआपल्या उपविभागाात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत कडक पेट्रोलीग करतील तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी / अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोर पणे बजावणे बाबत मा. पोलीस आधिंक्षकांनी सुचना दिल्या आहेत. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व २२ पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त लावला असुन बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस दल यांचे ३ प्लाटुन तसेच होमगार्ड— १००० पुरूष आणि २०० महीला असे अतिरिक्त मनुष्यबळ मागविण्यात आले आहे. सहा उपविभागात ६ विभागीय पेट्रोलींग पथक नेमण्यात आलेले आहे. दंगा नियंत्रण पथक यांचा बंदोबस्तामध्ये समावेश आहे. विशेष ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात आलेले आहे. **नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस बारकाईने सोशल मिडीया मॉनिटरींग करीत असुन कोणत्याही धर्माच्या/ जातीच्या/समुदायाच्या धार्मिक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल याप्रकारचे कृत्य करणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे नोंद करण्यात येणार आहे**

**मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी वेळोवेळी नागपुर ग्रमीण जिल्हयातील मशिदींना भेट देवुन मुस्लीम बांधवाच्या भेटी घेवुन मुस्लीम**

**बांधवांसोबत संवाद साधुन त्यांना जातीय सलोखा ठेवुन शांततेत सणोत्सव साजरा करण्या बाबत मार्गदर्शन केले आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सर्वांना सर्तकतेने बंदोबस्त करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन सावनेर :— दिनांक २९/०३/२०२५ रोजी सावनेर पोलीस हददीत पेट्रलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक होणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सिल्लोरी ते ब्रम्हपुरी रोड येथे पेट्रोलींग केली असता एक संशयीत विनाक्रमांकांचा लाल रंगाचा महींद्रा अर्जुन अल्ट्रा ट्रॅक्टर व ट्रॉली मिळुन आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **प्रदयुमन ईश्वरजी लोही , वय २५ वर्षे, पत्ता. बोरगाव ता. सावनेर** याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहना मधुन **१) १ ब्रास रेती किंमती ३०००/— रूपये आणि २) विनाक्रमांकांचा लाल रंगाचा महींद्रा अर्जुन अल्ट्रा ट्रॅक्टर व ट्रॉली किंमती ७,००,०००/— रूपये असा एकुण ७,०३,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**वाहन चालक आरोपी नामे प्रदयुमन ईश्वरजी लोही , वय २५ वर्षे, पत्ता. बोरगाव, ता. सावनेर याच्या विरूध्द पोस्टे सावनेर येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम, कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम, सहकलम मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर